# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे- ४०११०७**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट २२६-२३** **दिनांक :- १४/०७/२०२३**

## मोबाईलचे टॉवरमधील बेस कार्ड व इतर मुददेमाल चोरी करणाऱ्या सराईत गुन्हेगारांना अटक करुन ३,८३,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत. वालीव पोलीस ठाणे, गुन्हेप्रकटिकरण पथकाची कामगिरी.

वालीव पोलीस ठाणे हद्दीत दिनांक २९/०५/२०२३ रोजी १८.३० वाजताचे पुर्वी गोखिवर, वसई पुर्व येथील पुजा पॅराडाईज बिल्डिंगचे आवारातील मोबाईल टॉवरचे शेल्टर रुम मधील बेस बॅन्ड कार्ड, जनरेटरची बॅटरी व रेक्टी फायरचे युनिट असा एकुण ३,४८,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरी केलेबाबत फिर्याद दिल्याने वालीव पोलीस ठाणेत गुन्हा नोंद क्र. ५७६/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर गुन्हयाचे तपासाचे अनुषगांने गुन्हयाचे तांत्रीक विश्लेषणाचे व गुप्त बातमीदारामार्फत मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपीत नामे १) अखिलेशकुमार रामचंद्र गुप्ता, रा. शंकुमामा चाळ, यादव पाडा गोखीवरे तलाव, वसई पुर्व, २) जहीर इस्तीयाक खान ऊर्फ सलीम, रा. झोपडे क्र. ०८, साकीनाका, ९० फुट रोड, अंधेरी पुर्व, मुंबई यांना ताब्यात घेवुन तपास केला असता त्यांनी वन नमुद गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांना सदर गुन्हयात अटक करण्यात आली आहे. अटक अरोपीतांकडे अधिक तपास केला असता वालीव पोलीस ठाण्याचे अभिलेखावरील आणखी ०३ गुन्हे केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. अटक आरोपीतांकडु गुन्हयातील चोरी केलेला मोबाईलचे टॉवरमधील बेस कार्ड, बॅटरी, पॉवर केबल वायर असा एकुण ३,८३,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत करुन खालील गुन्हे उघडकिस करण्यात यश आले आहे.

**-:उघडकीस आणलेले गुन्हे:-**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गुन्हा नोंदवही क्रमांक व कलम |
|---|---|---|
| १. | वालीव | गुन्हा.रजि.नं. ५७६/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९, ३४ प्रमाणे (मुळ गुन्हा) |
| २. | वालीव | गुन्हा.रजि.नं. ३५२/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ३. | वालीव | गुन्हा.रजि.नं. ४७८/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे |
| ४. | वालीव | गुन्हा.रजि.नं. ४९१/२०२३ भा.दं.वि.सं. कलम ३७९, ५११,३४ प्रमाणे |

सदरची कामगिरी श्रीमती पोर्णीमा चौघुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २, वसई, श्री. विनायक नरळे, सहाय्यक पोलीस आयुक्त, तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. कैलास बर्वे, पो.नि. श्री. राहुलकुमार पाटील (गुन्हे) तसेच गुन्हे प्रकटिकरण पथकाचे स.पो.नि. ज्ञानेश फडतरे, पो.हवा. मुकेश पवार, मनोज मोरे, किरण म्हात्रे, सचिन दोरकर, सतीश गांगुर्डे, बाळु कुटे, पो.अंम. अभिजीत गढरी, विनायक राऊत यांनी केली आहे.




**-----0000------**